२०२

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २८ /११/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.एसएसए-१११९/प्र.क्र.२८०/विशा -४, दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३.

**विषय :-** फोर्सवन अंतर्गत युसीटीसी प्रशिक्षण केंद्र, पुणे कार्यालयासाठी मेससाठी प्रमुख स्वयंपाकी, सहाय्यक स्वयंपाकी व भोजनसेवक अशी १० कर्मचा-यांची पदे व साफसफाईसाठी ३ सफाई कर्मचा-यांची पदे बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने भरण्यास मंजूरी देण्याबाबत व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.एसएसए-१११९/प्र.क्र.२८०/विशा -४, दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३११२४१८०८४४६८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (फोर्स वन), महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहायक पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र.८अ, २६ब

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**फोर्सवन अंतर्गत युसीटीसी प्रशिक्षण केंद्र, पुणे कार्यालयासाठी मेससाठी प्रमुख स्वयंपाकी, सहाय्यक स्वयंपाकी व भोजनसेवक अशी १० कर्मचा-यांची पदे व साफसफाईसाठी ३ सफाई कर्मचा-यांची पदे बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने भरण्यास मंजूरी देण्याबाबत व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एसएसए- १११९/ प्र.क्र.२८०/विशा-४.**
दुसरा मजला,मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुख्य इमारत, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २४ नोव्हेंबर, २०२३.

**वाचा :-** १. गृह विभाग, शासन निर्णय क्र. एसएसए- १११९/ प्र.क्र.२८०/विशा-४, दि. २६.०३.२०२१.
२. गृह विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. एसएसए- १११९/ प्र.क्र.२८०/विशा-४, दि. १०.११.२०२२.
३. अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक ०६.०१.२०२३ चे पत्र.
४. शासनाचे क्र.एसएसए-१११९/प्र.क्र.२८०/विशा-४ दि.१३.०२.२०२३ चे पत्र.
५. अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक ०६.०४.२०२३ चे पत्र.
६. शासनाचे क्र.एसएसए-१११९/प्र.क्र.२८०/विशा-४ दि.१५.०६.२०२३ चे पत्र.
७. अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक २८.०६.२०२३ चे पत्र.

**प्रस्तावना:-** संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय दिनांक २६.०३.२०२१ व संदर्भ क्र.२ येथील शासन शुध्दीपत्रक दिनांक १०.११.२०२२ अन्वये, फोर्सवन अंतर्गत युसीटीसी प्रशिक्षण केंद्र, पुणे कार्यालयासाठी मेससाठी १ प्रमुख स्वयंपाकी, २ सहाय्यक स्वयंपाकी व ४ भोजन सेवक अशा ७ कर्मचा-यांची व साफसफाईसाठी ३ कर्मचा-यांची सेवा दिनांक ०१.०४.२०२० ते दिनांक ३१.०३.२०२३ या कालावधीसाठी बाहययंत्रणेव्दारे युनिसेक मॅनेजमेंट सर्व्हिसेस, पुणे यांच्याकडून कंत्राटी पध्दतीने घेण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर मुदत दिनांक ३१.०३.२०२३ रोजी संपुष्टात आली आहे. त्याअनुषंगाने अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन यांनी संदर्भ क्र.३ येथील दिनांक ०६.०१.२०२३ च्या पत्रान्वये फोर्सवन अंतर्गत युसीटीसी प्रशिक्षण केंद्र, पुणे कार्यालयासाठी मेससाठी प्रमुख स्वयंपाकी/ सहाय्यक स्वयंपाकी/ भोजन सेवक अशी ७ कर्मचा-यांची सेवा व साफसफाईसाठी ३ सफाई कर्मचारी बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने घेण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ४ येथील दिनांक १३.०२.२०२३ च्या पत्रान्वये प्राप्त होणारे दर बाजारभावाशी सुसंगत असण्याची व विहित प्रक्रियेचा अवलंब करण्याच्या अटीच्या अधीन राहून सदर प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्यात आली होती. फोर्सवन अंतर्गत युसीटीसी, पुणे या कार्यालयामार्फत ७ मेस कर्मचारी व ०३ साफसफाई कर्मचारी पुरविणेबाबत ई निविदा प्रक्रिया राबवून विहित नियमाप्रमाणे युनिसेक मॅनेजमेंट सर्व्हिसेस, पुणे यांना दि.०१.०४.२०२३ ते दि.३१.०३.२०२६ या कालावधीकरिता कंत्राट देण्यात आले. त्याअनुषंगाने फोर्सवन अंतर्गत युसीटीसी, पुणे कार्यालयासाठी व मेससाठी १ प्रमुख स्वयंपाकी, २ सहाय्यक स्वयंपाकी व ४ भोजन सेवक अशा ७ कर्मचा-यांची व साफसफाईसाठी ३

कर्मचा-यांची सेवा बाहययंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने घेण्याबाबत मान्यता देण्याची व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>**

फोर्सवन अंतर्गत युसीटीसी प्रशिक्षण केंद्र, पुणे कार्यालयासाठी मेससाठी १ प्रमुख स्वयंपाकी, २ सहाय्यक स्वयंपाकी व ४ भोजन सेवक अशा ७ कर्मचा-यांची व साफसफाईसाठी ३ कर्मचा-यांची सेवा दिनांक ०१.०४.२०२३ ते दिनांक ३१.०३.२०२६ या कालावधीसाठी बाह्ययंत्रणेव्दारे युनिसेक मॅनेजमेंट सर्व्हिसेस, पुणे यांच्याकडून कंत्राटी पध्दतीने घेण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने मेससाठी १ प्रमुख स्वयंपाकी, २ सहाय्यक स्वयंपाकी व ४ भोजन सेवक अशा ७ मेस कर्मचा-यांसाठी वार्षिक मानधन रु.१५,५७,९२४/- (रुपये पंधरा लाख सत्तावन्न हजार नऊशे चोवीस फक्त) व ३ सफाई कर्मचा-यांसाठी वार्षिक मानधन रु.६,४३,५००/- (रुपये सहा लाख त्रेचाळीस हजार पाचशे फक्त) अशा एकूण रु.२२,०१,४२४/- (रु.बावीस लाख एक हजार चारशे चोवीस फक्त) एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर खर्चाचे विवरणपत्र पुढीलप्रमाणे आहे.

कंत्राटी पध्दतीने घेण्यात आलेल्या ७ मेस कर्मचा-यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **पदाची संख्या** | **एक पदाचे मासिक वेतन** | **एकूण पदाचे मासिक वेतन** | **७ पदाचे वार्षिक वेतन** |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रमुख स्वयंपाकी | ०१ | २०,१८३/- | २०,१८३/- | १,२९,८२७ X १२ = १५,५७,९२४/- |
| २ | सहाय्यक स्वयंपाकी | ०२ | १९,०७२/- | ३८,१४४/-/- | |
| ३ | भोजन सेवक | ०४ | १७,८७५/- | ७१,५००/- | |
| | **एकूण** | **०७** | | **१,२९,८२७/-** | **१५,५७,९२४/-** |

कंत्राटी पध्दतीने घेण्यात आलेल्या ३ सफाई कर्मचा-यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **पदाची संख्या** | **एक पदाचे मासिक वेतन** | **एकूण पदाचे मासिक वेतन** | **३ पदाचे वार्षिक वेतन** |
|---|---|---|---|---|---|
| १ | सफाई कर्मचारी | ०३ | १७,८७५/- | ५३,६२५/- | ५३,६२५ X १२ = ६,४३,५००/- |
| | **एकूण** | | | | **६,४३,५००/-** |

२. सदरचा खर्च हा “२०५५ पोलीस, (००) (०१) संचालन व प्रशासन, (००) (०१) पोलीस निरीक्षणालय (२०५५००१४) -१० कंत्राटी खर्च” या लेखाशिर्षांतर्गत मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. याबाबतच्या शासन निर्णयास वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/ विनिमय, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-चार मधील, अ.क्र.११ मधील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अटीच्या अधीन राहून मंजूर देण्यास हरकत नसावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३११२४१८०८४४६८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2023.11.24 18:09:50 +05'30'

**( चेतन निकम )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
३) अपर पोलीस महासंचालक, फोर्सवन, महाराष्ट्र राज्य, गोरेगांव, मुंबई-४०० ०९८.
४) महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
५) महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
६) अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
८) वित्त विभाग (विनियम), मंत्रालय, मुंबई.
९) कार्यासन बीयुडी-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती- विशा-४, गृह विभाग.